*G - 7982*

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**ई-निविदा सूचना**

क्र.संगाबाअवि/१/१३७/४-३६३/२०२४ दिनांक : ०६/०७/२०२४

कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाद्वारे विद्यापीठातील प्रशासकीय तथा शैक्षणिक इमारती आणि विद्यापीठ परिसरातील स्वच्छता व साफसफाईची कामे कंत्राटी (ठेका) पद्धतीने करण्याकरिता एक वर्ष कालावधीस्तव पंजीबद्ध नोंदणीकृत कंत्राटदार/सेवा पुरवठादार निविदाधारकांकडून ऑनलाईनद्वारे द्विलिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे.सविस्तर निविदा www.sgbau.ac.in वर माहितीकरिता व महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि.१०/०७/२०२४ पासून पाहण्यास उपलब्ध असून सदर वेबसाईटवर निविदा भरता येईल.

कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**ई-निविदा सूचना**

क्र.संगाबाअवि/१/१३७/४-३६३/२०२४ दिनांक : ०६/०७/२०२४

कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाद्वारे विद्यापीठातील प्रशासकीय तथा शैक्षणिक इमारती आणि विद्यापीठ परिसरातील स्वच्छता व साफसफाईची कामे अंशकालिक तत्वावर कंत्राटी (ठेका) पद्धतीने करण्याकरिता एक वर्ष कालावधीस्तव पंजीबद्ध नोंदणीकृत कंत्राटदार/सेवा पुरवठादार/निविदाधारकांकडून ऑनलाईन पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे.सविस्तर निविदा www.sgbau.ac.in वर माहितीकरिता व महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि. १०/०७/२०२४ पासून पाहण्यास उपलब्ध असून सदर संकेतस्थळावर निविदा भरता येईल.

कुलसचिव,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**ई-निविदा सूचना**

क्र.संगाबाअवि/१/१३७/४-३६३/२०२४ दिनांक : ०६/०७/२०२४

खालील अंशकालिक कामाची ई-निविदा पंजीबद्ध नोंदणीकृत कंत्राटदार निविदाधारकांकडून मागविण्यात येत आहे. सविस्तर निविदा www.sgbau.ac.in वर माहितीकरिता व महाराष्ट्र शासनाच्या http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून निविदा भरता येईल.

| अ.क्र. | कामाचे विवरण | निविदा आवेदनपत्राची किंमत जीएसटीसह | निविदा इसार रक्कम (EMD) | निविदा सादर करण्याची अंतिम तिथी दुपारी -१.००वा. पर्यंत | निविदा उघड करण्याची तिथी दुपारी १.००वा. |
|---|---|---|---|---|---|
| | **Annual Contract for-** | | | | |
| १. | Cleaning of all roads in the University Campus, cleaning of all the buildings in the campus,such as All Postgraduate Teaching Departments, Boys and Girls Hostels, Valuer Hostel & Guest House and all other buildings alongwith its tiolets, Bath-rooms, wash rooms, urinals, etc. Whenever, it is necessary to clean the septic tanks, toilets' chambers, drainage outlets (as per enclosed list),and to dispose off the dead animals. [The cost of Acid, Kharats, Phenyl, Naptheline balls, etc. to be used for cleaning of all above work should be borned by the Contractor) | २००६०/- | १,६०,००० | ३१/०७/२०२४ | ०२/०८/२०२४ |

कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

***अटी व शर्ती -***

१. उपरोक्त निविदा,पंजीबद्ध नोंदणीकृत कंत्राटदार/सेवा पुरवठादार निविदाधारकांकडून मागविण्यात येत आहे.

२. सदर निविदा दि.१०/०७/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात येत असून ई-निविदा द्वारे सदर निविदा सादर करण्याची अंतिम तारीख ३१/०७/२०२४ रोजी दुपारी ०१.०० वाजता आहे. सादर झालेल्या निविदा उघडण्याची तारीख शक्यतो - ०२/०८/२०२४ रोजी दुपारी ०१.०० वाजता आहे. सदर निविदा ई-निविदा कक्ष, अभियांत्रिकी विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथे उघडण्यात येतील.

३. कंत्राटदार/सेवापुरवठाधारकाने निविदेमध्ये किमान वेतन कायद्यानुसार प्रति व्यक्ती (सफाईगार) मासिक (दर) रक्कमेची निविदा सादर करावी. तसेच निविदेत नमुद केलेल्या मासीक वेतनात सर्विस चार्जेस (सेवा शुल्क) बाबत जर एजन्सिने/निविदाधारकांनी शुन्य/निरंक अथवा अव्यवहार्य टक्केवारी नमुद केली तर अशी निविदा अप्रतिक्रियाशील/भावशुन्य (Unresponsive) ठरविण्यात येवुन विचारात घेतली जाणार नाही.

४. कंत्राटदार निविदाधारकाने निविदेमध्ये प्रति व्यक्ती (सफाईगार) सेवा शुल्क इत्यादींचा अंतर्भाव निविदा सादर करताना करावा.

५. सफाईगारांची अपेक्षित संख्या ८० राहील.

६. निविदाधारकांनी ई-निविदेसोबत लिफाफा क्र. १ मध्ये खालील दस्ताऐवज जोडणे आवश्यक आहे. सदर लिफाफा ई-टेंडर उघडण्याचे अगोदर सा.प्र.विभागास सादर करावा. सदर लिफाफा क्र.१ सादर न केल्यास निविदा उघडण्यात येणार नाही.

अ) नोंदणी प्रमाणपत्र ब) अद्ययावत आयकर निर्धारण प्रमाणपत्र, क) जी.एस.टी.नोंदणी प्रमापत्र ड) पॅन क्रमांक इ) ई.एस.आय.सी. प्रमाणपत्र ई) अनुभव प्रमाणपत्र उ) कोणत्याही इतर संस्थेने काळ्या यादीत न टाकल्याचे हमीपत्र ऊ) फॉल क्लॉज प्रमाणपत्र.

७. सहा.कुलसचिव (प्रशा.) यांचे कार्यालयामध्ये नोटीस बोर्डावर सविस्तर निविदा सुचना पाहावयास मिळेल.

८. कोणतेही कारण न सांगता/ न देता सदहू निविदा अंशतः किंवा पूर्णतः स्वीकारण्याचे वा नाकारण्याचे अधिकार विद्यापीठाने राखून ठेवण्यात आलेले आहे.

९. निविदा इसार रक्कम ऑनलाईन भरावी लागेल.

१०. निविदा संबंधित भरावयाची रक्कम जसे अनामत/सुरक्षा रक्कम इ.वित्त व लेखा अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे नावे असलेल्या धनाकर्ष (Demand Draft) अथवा वित्त व लेखा अधिकारी ह्यांचे नावे असलेल्या एफ.डी.आर. अथवा रोखीने विद्यापीठ खाती भरण्यात यावी.

११. बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था/लोकसेवा केंद्र हे सदर कामाच्या निविदा ई-निविदाद्वारे भरण्याची कार्यवाही करू शकतात. सदर संस्थांना अनामत रक्कम (ई.एम.डी.) भरण्यापासून सुट असून त्यासाठी आवश्यक प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

सहा.कुलसचिव (प्रशा.)
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

***प्रतिलिपी माहितीस्तव-***

१. वित्त व लेखा अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
२. प्रमुख, संगणक केंद्र, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांना निविदा सुचना संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याकरिता
३. उपकुलसचिव (लेखा), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
४. सहा.कुलसचिव (अंकेक्षण), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

***प्रत माहिती व प्रसिद्धी देण्यास्तव-***

५. उपसंचालक, रोजगार व स्वयंरोजगार विभागीय मुख्यालय, गांधी चौक, अमरावती
६. सहायक संचालक, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, दत्त पॅलेस, गांधी चौक, अमरावती यांना विनंती की, उपरोक्त निविदा सुचना बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था व लोकसेवा केंद्र यांना वितरीत करावी.
७.नोटीस बोर्ड

Envelope -01

## Sant Gadge Baba Amravati University

## E-Tender Notice (Technical Bid)
## Tender No.02/2024

To,
Registrar,
Sant Gadge Baba Amravati University
Amravati

**Subject : Providing services for house keeping and cleaning in University premises**
Ref'nce : E-Tender Notice No.SGBAU/1/137/4-363/2024. date 06/07/2024.

R/Sir,

With reference to above I/We/M/s........................................................................... quote herewith the rates for supply of cleaning and house keeping. I/We read & accepted all terms & conditions which is enclosed with this Tender Form.

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Full Name of Contractor/Service Provider : | | |
| 2 | Name of Firm : | | |
| 3 | Address of the Firm : | | |
| 4 | E-Mail : | | |
| 5 | Phone No. : | | |
| 6 | Mobile No. : | | |
| 7 | Shop Act Registration Certificate (if applicable) | Enclosed | Not Enclosed |
| 8 | Income Tax Clearance Certificate/Return Certificate (Last three year) | Enclosed | Not Enclosed |
| 9 | GST Registration Certificate | Enclosed | Not Enclosed |
| 10 | EMD Exemption Certificate (for availing the facility of exemption) | Enclosed | Not Enclosed |
| 11 | PAN Card | Enclosed | Not Enclosed |
| 12 | Experience Certificate or Order copy of other firm regarding this type of work. | Enclosed | Not Enclosed |
| 13 | Declaration regarding Blacklisting/Debarring of taking part in Tender (As per Annexure-A) | Enclosed | Not Enclosed |
| 14 | Fall Clause Certificate (As per Annexure-B) | Enclosed | Not Enclosed |
| 15 | General terms and conditions and Standard terms & conditions (As per Annexure-C) | Enclosed | Not Enclsoed |
| 16 | Tender Form Fee and Tender Deposite Money (EMD) (As per norms) | Enclosed | Not Enclsoed |

I/We have read carefully and have understood the same in vernacular known to me/ us about all the General Terms & Conditions and Standard Terms & Conditions and I/We hereby agrees to the same and shall abide by them hence this verification.

Name of Firm : -------------------------------------------------------
GST Registration No. :-------------------------------------------------------
PAN : -------------------------------------------------------
Signature of Contractor/Service provider :-------------------------------------------------------
Name of the Authorized signatory :-------------------------------------------------------
Seal of the Firm :

Tender cost Rs. 20060/-

# Sant Gadge Baba Amravati University

## E-Tender Notice No.02/2024
## (Commercial Bid)

To,
Registrar,
Sant Gadge Baba Amravati University
Amravati.

**Subject : Inviting online e-tender from reputed Contractor/Service provider for providing manpower on contract basis for House Keeping and Cleaning work.**
Ref'nce : Tender Notice No.SGBAU/137/4-363/2024, dt.06/07/2024.

R/Sir,

With reference to above I/We, M/s .............................................................................. quote hereby rate to provide manpower for House Keeping and Cleaning Work of University Buildings, Campus area, etc. I/We have read and accept terms & conditions mentioned in the tender notice.

| Sr.No. | Particulars | Per person monthlyh rate |
|---|---|---|
| | (As per minimum wages act for part time sweepers) | |
| 1. | BASIC PAY (60% of full time sweepers) | 6000/- |
| 2. | Dearness Allowance (60% of full time sweepers) | 3672/- |
| 3. | PF --- 13 % | 780/- |
| 4. | ESIC --- 3.25 % | 195/- |
| 5. | Other | ------------------------------------------------------------ |
| 6. | Service Charge Mentio in percentege | ------------------------------------------------------------ |
| 7. | GST 80% | ------------------------------------------------------------ |
| 8. | Total | ------------------------------------------------------------ |
| 9. | Monthly Material Cost (including Material,Chemicals. Used cfor cleaning of all work, Mechines Tools & Tackles. | |
| 10. | Grant Total (8+9) | ------------------------------------------------------------ |

I/We have read carefully the terms & conditions and have understood the same in vernacular known to me/us. I/We have hereby agree to the same and shall abide by them.

Name of Firm : ------------------------------------------------------
GST Registration No. : ------------------------------------------------------
PAN : ------------------------------------------------------
Signature of Contractor/Service Provider : ------------------------------------------------------
Name of the authorized signatory : ------------------------------------------------------
Seal of the Firm : ------------------------------------------------------

*G -7987*

# करारनामा

रू.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर

हा करारनामा अमरावती येथे आज दि.—————————— रोजी खालीलप्रमाणे दोघांमध्ये करण्यात आलेला आहे.

**पार्टी नं.१** :- संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
तर्फे
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

**पार्टी नं.२** :- पूर्ण नांव व पत्ता ————————————————————
(कंत्राटदार) ————————————————————

ज्याअर्थी, विद्यापीठातील रस्ते, परिसर इमारती व स्वच्छता गृहांची कंत्राटी (ठेका) पद्धतीने स्वच्छता व साफसफाई करावयाची आहे.

आणि

ज्याअर्थी निविदेसोबतचे जोडपत्रातील स्वच्छता व साफसफाई बाबतच्या नमुद केलेल्या अटी व शर्ती अस्तित्वात आहे.

आणि

ज्याअर्थी, विद्यापीठाने त्याच्या कार्यादेश क्र. ——————————————, दिनांक ——— —— नुसार कामाचे विवरणामधील वार्षिक एकत्रित रक्कम (दर) नुसार स्वच्छता व साफसफाईचा पार्टी नं.२ चा निविदा अर्ज स्वीकृत केलेला आहे.

आणि

ज्याअर्थी, कंत्राट पार्टी नं.२ ला देण्यात आला आहे.

आणि

ज्याअर्थी, कंत्राटदाराने स्वच्छता व साफसफाई कामात परिसरातील रस्ते, परिसर, शैक्षणिक विभाग, मुला-मुलींचे वसतीगृहे, परीक्षक वसतीगृह आणि अतिथीगृह इ.इमारतीमधील साफसफाई तसेच या इमारतींमधील प्रसाधनगृह व शौचालय स्वच्छ करण्यासाठी करार करण्याचे मान्य केले आहे.

आणि

ज्याअर्थी, कंत्राटदाराने सुरक्षा ठेव रू. ————— (अक्षरी रूपये ———————————— फक्त) विद्यापीठ खाती जमा केलेले आहे.

**त्याअर्थी,** पार्टी नं.१ व पार्टी नं.२ निविदेसोबतच्या अटी व शर्तीनुसार प्रती व्यक्ती मासिक एकत्रित रक्कम (दर) नुसार साफसफाई व स्वच्छता करण्याचे करारनामा लिहून देत आहे.

१. कंत्राटाचा कालावधी एक वर्षाकरिता दि. / /२०२ ते दि. / /२०२ पर्यंत राहिल.

२. कंत्राटदाराने त्यास प्राप्त झालेल्या नियुक्त पत्रातील सर्व अटी व शर्ती वाचल्या आहेत आणि त्या त्यांना कंत्राटराला समजल्या आहेत. त्या सर्व अटी व शर्ती कंत्राटदाराला मान्य आहेत.

३. जर कंत्राटदाराकडून एखाद्या अटी/शर्तीचा भंग झाला तर कंत्राटदार म्हणून झालेला करारनामा रद्द केला जाईल. याची कंत्राटदाराला जाणीव आहे.

४. कंत्राटदाराने यासंदर्भातील सर्व माहिती जाणून घेतल्यानंतर जाणीवपूर्वक व स्वेच्छेने सदर कंत्राटी काम स्वीकारले आहे.

५. या कंत्राटीकामानंतर कंत्राटदाराला व त्याच्या संस्थेला कायम स्वरूपी काम मिळण्याचा हक्क राहणार नाही. तसेच, या करारनाम्याच्या कालावधीनंतर विद्यापीठावर कोणतीही जबाबदारी राहणार नाही व या कंत्राट सेवेशी निगडीत कोणत्याही प्रकारची मागणी कंत्राटदार वा त्याची संस्था करणार नाही, अशी या करारनाम्याद्वारे हमी देत आहे.

६. पार्टी नं.१ ला पार्टी नं.२ रू. १००/- (अक्षरी रू.शंभर फक्त) चे स्टॅम्पपेपरवर प्रतिज्ञालेख करून देण्याची हमी देतो.

७. कंत्राटाचे कालावधीचे दरम्यान कोणत्याही पद्धतीची अडचण निर्माण झाल्यास त्यावर मा.कुलगुरूंनी दिलेला निर्णय हा अंतिम समजण्यात येईल.

८. या नियमामध्ये निर्माण होणारे सर्व विवाद हे न्यायिक व सलोखा कायदा (Arbitration & Conciliation Act) च्या तरतुदीअंतर्गत निकाली काढले जातील व सर्व प्रकारच्या विवादाचे निराकरण अमरावती न्यायालयाचे कक्षेअंतर्गत राहील.

९. कंत्राटदाराचे कामकाज असमाधानकारक आढळून आल्यास`कुठलिही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.याबद्दल कंत्राटदाराची कुठलिही तक्रार राहणार नाही.

१०. कंत्राटदाराने प्रती दिवस मनुष्यबळ संख्या किमान ८० आणि प्रती सफाईगार किमान ५ तास (Man Hours) यानुसार काम करावे लागेल.

११.पार्टी नं.२ (कंत्राटदार) यांनी सोबत जोडलेल्या अटी व शर्तीचे पालन न केल्यास अथवा त्याचे पालन करण्यास ते असमर्थ ठरल्यास कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करण्याचे अधिकार पार्टी नं.१ यांनी राखून ठेवले आहे. सदर दंडाची राशी शोधन न झालेल्या देयकातून किंवा सुरक्षा ठेव रकमेतून वसुल करण्यात येईल.

पार्टी नं.१ व पार्टी नं.२ ह्यांनी या करारनाम्यातील सर्व परिच्छेद आणि निविदेसोबतच्या अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचून व समजून घेवून करार मान्य केल्याबाबत करारनाम्यावर स्वाक्षरी करीत आहोत.

अमरावती :
दिनांक :

________________________

पार्टी नं.१ -कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

________________________

पार्टी नं.२ - कंत्राटदार

साक्षीदार
१) __________________

२)__________________

**Prepabed by** **Verified by** **Approved by M.C.**
**vide Item No.**
**Dated.**

Users/Aurn Dudhe/E-Tender.pmd (10-11)

Annexure-A

# DECLARATION REGARDING BLACKLISTING/DEBARRING FOR PARTICIPATING IN TENDER

(To be executed by bidder having attested by public Notary/Executive Magistrate on Rs.100/- judicial Stamp paper)

I/We ........................................................................................Service provider of House Keeping and Cleaning hereby delcare that the firm/company namely M/s ........................................................................................ has not been blacklisted or debarred in the past by Union/State Government or by any other organization from taking part in tenders in India.

**Or**

I/We ........................................................................................................................................ Service provider for House Keeping and Cleaning hereby declare that the firm/company namely M/s........................................................................................ has not been blacklisted or debarred in the past by Union/State Government or by any other organization from taking part in tenders for a period of ........................................................................ years w.e.f. .......................................... to ................................ The period is over on ........................................ and now the firm/compnay is entitled to take part in tenders.

In case the above inforamtion found false, I /We fully aware that the tender/contract will be rejected /cancelled by the University and EMD/SD shall be forfeited. In addition to the above the University will not be responsible to pay the bills for any completed/partially completed work.

DEPONENT

Name : ---------------------------------------------------

Address : ----------------------------------------------

---------------------------------------------------------

---------------------------------------------------------

Attested :

(Public Notary/Executive Magistrate)

## Annexure-B

# FALL CLAUSE NOTICE CERTIFICATE

This is to certify that I/we have offered the maximum possible discount to you in our Tender No. .......................................................................................... Dated ............................... The Price Charged for House Keeping and Cleaning under Rate Contract should under no event by higher then lowest prices at which the party provides service the terms of identical description to any other Govt. organization / PSU/s / Autonomous bodies / Pvt. Organization during the period of contract failing which the "FALL CLAUSE" will be applicable.

In case, if the price charged by our firm is more, Sant Gadge Baba Amravatil University will have the right to recover the excess charged amount from the subsequent/ unpaid bill of the supplier or security deposite.

Seal and signature of Tenderer

***Note*** : This letter of authority should be on the letter head of the quoting firm and should be signed by the person competent and having the power of attorney to bind the same.

***Annexure-C***

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## स्वच्छता व साफसफाईच्या अटी व शर्ती

१. निविदाधारक हा पंजीबद्ध नोंदणीकृत असावा.

२. कंत्राटदाराचा कालावधी करारनाम्याच्या तारखेपासून एक वर्षाचा राहील. असाधारण परिस्थितीत मा.कुलगुरूंच्या मान्यतेने सदर कंत्राटास तीन महिन्याची मुदतवाढ देण्यात येईल.

३. निविदेमध्ये दिलेल्या कामाचे विवरणामधील स्वच्छता व साफसफाईचे प्रती व्यक्ति (साफसफाईगार) वेतन, भत्ते व सेवाशुल्क इ. रक्कम (दर) द्यावे लागेल.

४. निविदेसोबत अनामत रक्कम (EMD) * रू.१,६०,०००/- विद्यापीठ खाती जमा करावी लागेल. सदर रक्कम ज्याला काम मिळेल त्यांच्या सुरक्षा ठेव मध्ये वळती करण्यात येईल किंवा सुरक्षा ठेव पूर्ण जमा केल्यास ही रक्कम परत करण्यात येईल.

५. निविदा मंजुर झाल्यावर कंत्राटदाराला मंजुर निविदेच्या ५ टक्के रक्कम सुरक्षा ठेव म्हणून विद्यापीठ खाती जमा करावी लागेल व त्यावर त्यांना कोणतीही व्याजाची मागणी करता येणार नाही. काम समाधानकारक पूर्ण झाल्यानंतर सदर रक्कम परत करण्यात येईल.

६. कोणत्याही सबबीवर संपूर्णतः किंवा अंशतः कोणतीही निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ ह्यांनी राखून ठेवला आहे.

७. कंत्राटदाराला स्वखर्चाने रू.५००/- च्या स्टॅम्पपेपरवर करारनामा, कंत्राट मंजुरीच्या तारखेपासून ७ दिवसांचे आंत विद्यापीठाला करून द्यावा लागेल व या व्यतिरिक्त रू. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञालेख करून द्यावा लागेल.

८. कंत्राटदाराला कामाचा आदेश प्राप्त झाल्यानंतर आदेशात दिलेल्या कामाच्या विवरणामधील स्वच्छता व साफसफाईचे संपूर्ण कामे समजावून घ्यावी लागेल.

९. प्रशासकीय व शैक्षणिक इमारती, परिसर, मुला-मुलींची वसतीगृहे, परीक्षक वसतीगृह, अतिथीगृह तसेच प्रसाधनगृहांची स्वच्छता व साफसफाई कंत्राटदारास दररोज करावी लागेल. स्वच्छता व साफसफाई करावयाच्या क्षेत्रफळाचे व प्रसाधनगृहे इ. माहिती दर्शविणारा तक्ता सोबत जोडला आहे. (Annexure-D)

१०. विद्यापीठातील सुरक्षा व्यवस्थेतील कर्मचाऱ्यांकडून आवश्यक वाटल्यास, कंत्राटदाराकडील सफाईगारांची ओळख केल्या जावू शकेल. याबाबत कंत्राटदाराचे अथवा त्यांच्या सफाईगारांचे कोणतेही आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाही. कंत्राटदाराने स्वखर्चाने त्यांना ओळखपत्र द्यावे व सर्व कामगारांनी विद्यापीठ परिसरात असतांना ओळखपत्र सोबत बाळगावे. तसेच, कंत्राटदार संस्थेने नियुक्त सफाईगारांना गणवेश (ड्रेस कोड प्रमाणे) पुरवावे व विद्यापीठाच्या आवारामध्ये सदर सफाईगार हे गणवेश घालून राहतील याची काळजी घ्यावी.

११. निविदा स्वीकारल्यानंतर कामाचे आदेश मिळाल्यापासून ७ दिवसाचे आंत कामे सुरू करावी लागेल. अन्यथा निविदा रद्द करून सुरक्षा रक्कम इ. विद्यापीठ फंडात जमा केल्या जाईल व या कारणास्तव जमा केलेली रक्कम कोणत्याही सबबीवर परत केल्या जाणार नाही.

१२. इमारतींच्या साफसफाईकरिता व प्रसाधनगृहे आणि शौच्यालये स्वच्छतेकरिता लागणारे आवश्यक ते साहित्य उदा. ॲसिड, खराटा, फिनाईल, डांबरी गोळ्या, ब्रश, ब्लीचींग पावडर इ. पुरविणे हे कंत्राटदारास बंधनकारक राहील. विद्यापीठाच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार कंत्राटदारास कामे करावे लागतील. साहीत्य न पुरविल्यामुळे स्वच्छता झाली नसल्याची तक्रार प्राप्त झाल्यास रू.५००/- प्रतिदिवसा प्रमाणे दंड आकारण्यात येईल.

१३. दर दिवसाला लावलेल्या सफाईगारांपैकी कामचुकार, कमकुवत, शारीरिक आजाराने पिडीत व अयोग्य वर्तणूक करणाऱ्या सफाईगाराबाबत जर तसे प्राधिकृत अधिकाऱ्याने कळविल्यावर त्याला बदलून वा बंद करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील व जर त्या कारणास्तव कामाचा खंड झाल्यास होणाऱ्या नुकसानास कंत्राटदार

जबाबदार राहील व त्याची भरपाई त्यांना विद्यापीठाला करून द्यावी लागेल. तसेच, कंत्राटदार हा त्याचे लावलेल्या सफाईगारांचे वय १८ वर्षा पेक्षा कमी आणि ५५ वर्षापेक्षा अधिक राहणार नाही, याची काळजी स्वतः घेईल.

१४. कंत्राटी सफाईगारांच्या कामावर नियंत्रण व देखरेख संबंधीत कंत्राटदाराची राहील.परंतु कंत्राटदाराला कामे विद्यापीठाचे निर्देशानुसार करावी लागतील. तसेच, तातडीची कामे विद्यापीठाच्या सुचनेनुसार पूर्ण करावी लागतील.

१५. कंत्राटी सफाईगारांना शासन निर्णयाप्रमाणे मजुरीचे शोधन करण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील. यासंबंधीच्या विधिवत तरतुदीअंतर्गत कोणतीही कायदेशीर अडचण उद्भवल्यास, त्याची सर्व जबाबदारी कंत्राटदाराची राहील. याबाबतच्या कोणत्याही बेकायदेशीर बाबींना विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

१६. कंत्राटदाराने स्वच्छता व साफसफाई केलेल्या कामाच्या देयकाचे शोधन पुढील महिन्यात करण्यात येईल.

१७. सहा.कामगार आयुक्त, कामगार विभाग, अमरावती ह्यांचे नियमाअंतर्गत देय असलेल्या सर्व बाबींचे शोधन जसे E.S.I.C. कर्मचारी राज्य विमा योजना, E.P.F. भविष्य निर्वाह निधी, इ. स्वतः हे कंत्राटदाराला करावे लागेल. विद्यापीठ या विषयी कोणतीही जबाबदारी स्वीकारणार नाही. सदर रक्कम संबंधित विभागाला जमा केल्याबाबतची चलानची प्रमाणित छायांकित प्रत तसेच, साफसफाई करिता वापरल्या जाणाऱ्या रासायनिक द्रव्य, साहित्य खरेदी केल्याची पावती, दर महिन्याला सुरक्षा विभागात जमा करावी लागेल. तसेच, विद्यापीठात जे कंत्राटी सफाईगार (स्त्री/पुरूष) कामावर राहतील त्यांचे शोधन नियमानुसार केल्याचे त्या सफाईगारांच्या स्वाक्षरीसह पुरावा दर महिन्याला सादर करावा लागेल, व त्याबाबतचे देयक अदा करण्यासाठी विद्यापीठाच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने त्या शोधनाचा खर्च / रक्कम तपासून पुढील महिन्याचे वेतन अदा करण्यात येईल.

१८. कंत्राटदाराने, सफाईगारांचे मजुरीचे शोधन बँकेमार्फत करून त्यांना देय झालेल्या राशीचे बँक स्टेटमेंन्ट कार्यालयाकडे सादर करण्यात यावे.

१९. कंत्राटदाराकडून दर महिन्याला प्राप्त होणाऱ्या देयकाच्या रकमेतून नियमानुसार आयकर, वस्तु व सेवाकर तसेच नियमानुसार देय असलेले कायदेशीर कर इत्यादीची कपात विद्यापीठाद्वारे करून सदर रक्कम संबंधित विभागाकडे जमा करण्यात येईल. त्याबद्दल कंत्राटदाराची कोणतीही उजर/तक्रार राहणार नाही.

२०. सफाईगारांच्या निष्काळजीपणामुळे विद्यापीठ मालमत्तेचे नुकसान अथवा चोरी झाल्याचे आढळल्यास भरपाईची रक्कम कंत्राटदाराकडून वसुल करण्यात येईल.

२१. सुरक्षा ठेव किंवा देयकाचे शोधनाला होणारा विलंब इ. कारणास्तव कोणतेही व्याज विद्यापीठाद्वारे देण्यात येणार नाही.

२२. स्वच्छता व साफसफाईचे कामाचा कंत्राट वर्षभराच्या कालावधीसाठी असला तरी कोणत्याही अटीचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आल्यास असा कंत्राट वर्षातून केव्हाही १५ दिवसपूर्व नोटीस देवून बंद करण्याचा अधिकार विद्यापीठाला राहिल. कंत्राटदाराला त्याच्या बाजुने मुदतपूर्व सेवा समाप्त करावयाची झाल्यास त्यांनी दिलेले कारण समाधानकारक वाटल्यास आणि त्यांनी तीन महिन्याची आगावू सूचना दिल्यावर व कुलसचिव यांनी प्रमाणित केल्यावरच कंत्राट समाप्त करता येवू शकेल. तथापि, सदर कंत्राटदाराची सुरक्षा ठेव जप्त करण्यात येईल.

२३. कंत्राटदाराने स्वीकृत केलेल्या कामाचा कंत्राट पूर्णतः किंवा अंशतः निवड झालेल्या कंत्राटदारास दुसऱ्या कंत्राटदाराला हस्तांतरीत करता येणार नाही.

२४. कंत्राटदाराने अस्तित्वात असलेला कामगार कायदा, किमान वेतन कायदा, नियम तसेच विनियम ह्यांचे पालन करणे आवश्यक आहे. कंत्राटी सफाईगारांच्या कोणत्याही दाव्यांसाठी विद्यापीठ जबाबदार राहणार नाही, ह्यांची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदराची राहील.

२५. कामाच्या वेळेस कंत्राटदाराचे कंत्राटी सफाईगाराला कोणत्याही प्रकारचा अपघात झाल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील. श्रमिक क्षतीपूर्ती कायद्यान्वये किंवा इतर कोणत्याही कायद्यान्वये सफाईगाराला

देय नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२६. Contract Labour Act (Regulation and Abolition) 1970 मधील सर्व तरतुदींचे पालन करण्याची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२७. विद्यापीठ आणि कंत्राटदाराने लावलेल्या सफाईगारामध्ये कोणताही नोकर मालक संबंध राहणार नाही व कंत्राटदाराने लावेलेल्या कोणत्याही इसमाला विद्यापीठाच्या विरूद्ध कोणत्याही पदावर किंवा नोकरी मागण्याचा वा तत्सम दावा करण्याचा अधिकार राहणार नाही. त्या सफाईगाराकरिता कंत्राटदार ह्यांची मालक म्हणून सर्वस्वी जबाबदारी राहील.

२८. सदर कंत्राट हा एक वर्ष कालावधी करिता कायम राहील. यात बदल अथवा वाढ करता येणार नाही.

२९. अर्जदाराने/निविदाधारकाने निविदा प्रपत्रासोबत खालील नमुद केलेल्या अधिकाऱ्यांकडून प्रमाणपत्र प्राप्त करून सादर करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | प्रमाणपत्राचा तपशिल | प्रमाणपत्र देय अधिकाऱ्याचे पदनाम | शेरा |
|---|---|---|---|
| १ | संस्थेची नोंदणी प्रमाणपत्र | १.उपनिबंधक सहकारी संस्था<br>२. मुंबई, दुकाने व संस्था अधिनियम १९४८ अंतर्गत नोंदणी | कोणतेही एक |
| २. | आयकर विवरण पत्र | आयकर अधिकारी, आयकर विभाग | |
| ३. | वित्तीय संपन्नतेचा पुरावा/प्रमाणपत्र | बँकेचे Solvency प्रमाणपत्र | |
| ४. | अनुभव प्रमाणपत्र | शासकीय/निमशासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेत काम केल्याचा पुरावा. | प्राधान्याने विचार करता येईल. |
| ५. | भविष्य निर्वाह निधी (ईपीएफ) १९५२ कायद्याअंतर्गत नोंदणी | सहाय्यक भविष्य निर्वाह निधी आयुक्त, अकोला | कामाचा आदेश प्राप्त झाल्यानंतर एका महिन्याचे आंत कामगारांचे खाते उघडून तसे प्रमाणपत्र कार्यालयास सादर करावे लागेल. |
| ६. | कर्मचारी राज्य विमा योजना १९४८ (ईएसआयसी) | उपसंचालक किंवा सहा.संचालक उपक्षेत्रिय ईएसआय कार्यालय,नागपूर | कामाचा आदेश प्राप्त झाल्यानंतर एका महिन्याचे आंत कामगारांचे प्रमाणपत्र कार्यालयास सादर करावे लागेल. |
| ७. | वस्तु व सेवा कर कायदा,२०१७ | संबंधित अधिकारी, वस्तु व सेवा कर कार्यालय. | |
| ८. | महाराष्ट्र राज्य व्यवसाय व्यापार आजिविका व नोकऱ्या यावरील कर अधिनियम, १९७५ अंतर्गत नोंदणी | व्यवसाय कर अधिकारी अमरावती यांचे प्रमाणपत्र | कामाचा आदेश प्राप्त झाल्यानंतर एका महिन्याचे आंत सदर प्रमाणपत्र कार्यालयास सादर करावे लागेल. |
| ९. | कंत्राटी कामगार Labour Licence (नियंत्रण व अंत) | Licensing Office Contract Labour (Reg.& Ablo.) 1970, Amravati | कामाचा आदेश प्राप्त झाल्यानंतर एका महिन्याचे आंत कामगारांचे प्रमाणपत्र कार्यालयास सादर करावे लागेल. |

***टिप*** (१) कंत्राटदाराने वरील प्रमाणपत्र ज्या शहरातून प्राप्त केले असेल ते वैध प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

(२) उपरोक्त अ.क्र. ५ ते ९ वरील प्रमाणपत्र वर दिलेल्या मुदतीत कार्यालयास सादर न केल्यास कंत्राटदाराने सादर केलेल्या कोणत्याही देयकाचे शोधनाची शिफारस करण्यात येणार नाही. तसेच, सुरक्षा रक्कम विद्यापीठ खाती जमा करण्यात येईल.

(३) जे सफाईगार कंत्राटदाराने कामावर लावले असतील त्यांच्या मजुरीचे शोधन नियमानुसार कंत्राटदाराला विहित मुदतीतच करावे लागेल. या कारणास्तव विद्यापीठाची कोणतीही कायदेशीर जबाबदारी राहणार नाही.

३०. परिसरातील मुख्य रस्त्यांची दररोज तसेच इतर रस्त्यांची वेळोवेळी आवश्यकतेनुसार साफसफाई करावी लागेल.

३१. सफाई व स्वच्छतेच्या कामाच्या वेळा कार्यालयाने ठरवून दिल्याप्रमाणे राहतील.

३२. निरिक्षक किंवा संबंधित अधिकारी ज्या प्रमाण सूचना देतील त्याप्रमाणे साफसफाई व स्वच्छतेची कामे सफाईगारास करावी लागतील व ती करवून घेण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

३३. साफसफाई व स्वच्छतेच्या कामाकरिता आवश्यक सफाईगार कामी लावणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

३४. पुरविण्यात आलेल्या सफाईगाराचे पूर्ण नाव, संपूर्ण पत्ता व त्यांचा पासपोर्ट आकाराचा फोटोग्राफ तसेच चारित्र्याचे प्रमाणपत्र कंत्राटदाराने प्रमाणित करून त्यांचे ओळखपत्र सुरक्षा विभागात जमा करावे. यामध्ये बाल कामगार ह्यांचा समावेश करण्यात येवू नये.

३५. सफाईगार गैरवर्तणूक करणारा अथवा बेजबादार असल्यास त्याचे बदली दुसरा सफाईगार कामी लावण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

३६. निविदेमध्ये नमुद केलेल्या दराव्यतिरिक्त कोणतीही रक्कम विद्यापीठाद्वारे कंत्राटदारास देय राहणार नाही.

३७. तातडीचे/महत्वाचे कारणास्तव गरज पडल्यास अथवा सूचना दिल्यावर सुटीचे दिवशी आणि रविवारी सुध्दा कंत्राटदारला सफाई कामगार उपलब्ध करून द्यावे लागतील.

३८. काम समाधानकारक न आढळल्यास किंवा कंत्राटदाराने मध्येच काम सोडून दिल्यास दंड आकारण्याचा, सुरक्षा रक्कम जप्त करण्याचा, किंवा नव्याने कंत्राट देण्याच्या खर्चाची रक्कम वसुल करण्याचा अधिकार कुलसचिव, सतं गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांनी राखून ठेवला आहे.

३९. कंत्राटदार व त्याचे सफाईगारास, इमारत आतून झाडू मारणे व पोछा मारणे व बाहेरून स्वच्छ करणे, इमारतीचे कोळीष्टके काढणे, इमारतीच्या सभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवणे, इमारतीमधील प्रसाधनगृहे व शौच्यालये सासत्याने स्वच्छ ठेवणे अनिवार्य राहील. त्याप्रमाणे जेव्हा जेव्हा आवश्यकता असेल तेव्हा तेव्हा सेप्टी टँक,टॉयलेट चेंबर व ड्रेनेज आऊटलेट स्वच्छ करून घ्यावी लागेल. व मृत प्राण्यांचा निपटारा करावा लागेल.

४०. कंत्राटाच्या कालावधी दरम्यान कोणत्याही पद्धतीची अडचण निर्माण झाल्यास त्यावर मा.कुलगुरूनी दिलेला निर्णय हा अंतिम समजण्यात येईल.

४१. या नियमामध्ये निर्माण होणारे सर्व विवाद हे न्यायीक वन सलोखा कायदा (Arbitration & Conciliation Act) च्या तरतुदीअंतर्गत निकाली काढले जातील व सर्व प्रकारच्या विविदाचे निराकरण अमरावती न्यायालयाचे कक्षेअंतर्गत राहील.

४२. संत गाडगे अमरावती विद्यापीठाच्या सक्षम प्राधिकारिणीच्या पूर्व परवानगी शिवाय करारनाम्यात कोणताही फेरबदल करता येणार नाही.

४३. कंत्राटदाराने प्रतिदिवस मनुष्यबळ संख्या किमान ८० आणि प्रती सफाईगार ५ तास (Man Hours) या नुसार काम करावे लागेल.

४४. कोणत्याही शैक्षणिक अथवा प्रशासकीय विभागाकडून स्वच्छतेसंबंधीची वा सफाईगारांच्या गैरहजरीविषयी तक्रार प्राप्त झाल्यास त्याचा निपटारा त्या दिवशीच्या कार्यकाळात करणे बंधनकारक राहील. तसे न झाल्यास १०० रुपये प्रती तास दंड विद्यापीठ खाती जमा करणे अथवा देयकातून कपात करण्यास कंत्राटदाराची कोणतीही हरकत राहणार नाही.

४५. निविदा भरतांना सर्व अटी व शर्ती मान्य असून, सर्व बाबींचा विचार करून निविदा भरत आहे, असे निविदा अर्जाच्या नमुना प्रपत्रावर नमुद करून स्वाक्षरी करावी लागेल.

४६. अपरिहार्य परिस्थितीमध्ये करारनाम्यास मुदतवाढ देण्याचे अधिकार मा.कुलगुरूंना राहतील.

४७. कंत्राटदाराकडून आवंटीत केलेल्या एकूण सफाईगारांपेक्षा काही प्रसंगी अतिरिक्त सफाईगारांची सेवा लागल्यास त्या अतिरिक्त सफाईगाराना प्रतिदिवस देय असलेले मानधन/मोबदल्याचा दर हा दैनिक वेतनिक/अकुशल यांचे दराप्रमाणे देय राहील.

४८. कंत्राटदानाने परिसरातील व विभागातील ओला व सुका कचरा वाहून नेण्याकरिता वाहनांची व्यवस्था करावी तसेच सदर कचरा उद्यान विभागाने ठरवून दिलेल्या ठिकाणी टाकण्याची व्यवस्था करावी. तसेच, अमरावती महानगरपालिकेकडे संपर्क साधून जैविक कचरा सोडून उर्वरित कचरा नेण्याची व्यवस्था कंत्राटदारास करावी लागेल.

उपरोक्त व अटी व शर्ती मी वाचल्या व समजावून घेतल्या आणि त्या मला बंधनकारक राहतील.

दिनांक / /२०२३

______________________

(कंत्राटदाराची सही व शिक्का)

*G - 7995*

***विद्यमान कार्यकारी दंडाधिकारी,अमरावती ह्यांचे समक्ष***

# प्रतिज्ञालेख

प्रतिज्ञार्थी ——————————————
वय ———— वर्षे, धंदा ————————
राहणार ————————————————
————————————————————

महोदय,

मी, ———————————— वर्ष, व्यवसाय ——————— रा.————— ————— आज दि. ———————————— रोजी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की, मी, विद्यापीठाची जाहिरात क्र. ——————————, दि. —————————— रोजी वृत्तपत्रात प्रकाशित झाल्यानुसार निविदा सादर केलेली आहे. मी, या निविदेसोबत जोड़लेले संपूर्ण दस्ताऐवज/प्रमाणपत्र संबंधीत सक्षम प्राधिकाऱ्याकडून घेतली असून ती कागदपत्रे खरी आणि योग्य मार्गाने मिळविलेली आहे. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची खाडाखोड/दुरूस्ती/बदल केलेला नाही.

निविदेसोबत जोडलेली कागदपत्रे बनावट असल्याचे आढळ्यास मी खालील तरतुदीनुसार होणाऱ्या दंडात्मक कार्यवाहीस पात्र राहिल याची मला जाणीव आहे. तसेच, विद्यापीठात लावलेल्या सफाईगारांमध्ये / मजुरांमध्ये कोणताही नोकर मालक संबंध राहणार नाही व कोणत्याही इसमाला विद्यापीठाच्या विरूद्ध कोणत्याही पदावर किंवा नोकरी मागण्याचा वा तत्सम दावा करण्याचा अधिकार राहणार नाही. अस्तित्वात असलेला कामगार कायदा, मजुरी कायदा, नियम तसेच विनियम ह्यांचे पालन करणे मला बंधनकारक राहील. सफाईगारांच्या/मजुरांच्या कोणत्याही दाव्यासाठी विद्यापीठ जबाबदार राहणार नाही, याची सर्वस्वी जबाबदारी माझी राहील. कामाच्या वेळेस सफाईगाराला/मजुराला कोणत्याही प्रकारचा अपघात झाल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी माझी राहील. श्रमिक क्षतिपूर्ती कायद्यान्वये किंवा इतर कोणत्याही कायद्यान्वये सफाईगाराला/ मजुराला देय नुकसान देण्याची जबाबदारी माझी राहील. Contract Labour Act (Regulation and Abolition 1970) च्या सर्व तरतुदींचे पालन करण्याची संपूर्ण जबाबदारी माझी राहील. तसेच, निविदेसोबत दिलेल्या अटी व शर्ती आणि करारनाम्यानुसार कार्यवाही करणे मला बंधनकारक आहे व राहील.

**करिता हा प्रतिज्ञालेख सादर करीत आहे.**

अमरावती
दि. —————

सही

——————————

## सत्यापन

मी, वर दिलेली माहिती संपूर्ण खरी आहे. खोटी आढळल्यास मी कलम भा.द.वि.१९३(२), १९९ व २०० प्रमाणे शिक्षेस व दंडास पात्र राहील, याची मला जाणीव आहे.

अमरावती
दि. ———————

सही

——————————